# उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा जळगाव

## कोतवाल संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात 2023

### जाहिरात क्रमांक 01/2023

जळगाव जिल्ह्यातील ०७ उपविभागातील १५ तालुक्यातील सजेतील कोतवाल या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता अर्हताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पद्धतीनेच https://jalgaon.ppbharti.in या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

मा. शासनाकडील पत्र क्र. संकीर्ण- २०२३/प्र.क्र.१७/ई-१० दि.१७ मे २०२३ अन्वये सन २०२३-(कोतवाल पदभरती) बाबत कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे.

**रिक्त पदाचा व प्रत्यक्षात भरावयाचे पदाचा तपशील**

| अ.क्र. | अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी यांचे कायार्लय | तालुका | कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात) एकूण रिक्त पदे | शासनाकडील पत्र दिनांक १७ मे २०२३ अन्वये ८०% प्रमाणे भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उपविभागीय कार्यालय जळगाव भाग | जळगाव | ०६ | ०५ |
| | | जामनेर | ०७ | ०६ |
| २ | उपविभागीय कार्यालय एरंडोल भाग | एरंडोल | ०४ | ०३ |
| | | धरणगाव | ०६ | ०५ |
| | | पारोळा | ०६ | ०५ |
| ३ | उपविभागीय कार्यालय पाचोरा भाग | पाचोरा | ०८ | ०६ |
| | | भडगाव | ०८ | ०५ |
| ४ | उपविभागीय कार्यालय फैजपूर भाग | रावेर | ०८ | ०६ |
| | | यावल | ०७ | ०६ |
| ५ | उपविभागीय कार्यालय अमळनेर भाग | अमळनेर | ०८ | ०६ |
| | | चोपडा | १२ | १० |
| ६ | उपविभागीय कार्यालय भुसावळ भाग | भुसावळ | ०२ | ०२ |
| | | मुक्ताईनगर | ०७ | ०६ |
| | | बोदवड | ०४ | ०३ |
| ७ | उपविभागीय कार्यालय चाळीसगाव भाग | चाळीसगाव | ०८ | ०६ |
| | | एकूण | १०१ | ८० |

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरूवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दि.१८/०७/२०२३ रोजी पासून | दिनांक : ३१/०७/२०२३ रात्री २३.५९ पर्यंत |

**ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक ३१/०७/२०२३**

कोतवाल भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात https://jalgaon.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरून विहित ऑनलाईन पद्धतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परीक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/ परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी यांना राहतील.

**दिनांक : १२/०७/२०२३**

स्वाक्षरीत/-
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी, जळगाव**